महाराष्ट्र शासन

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-१/संकीर्ण/२०२४/ 462 दिनांक: 12 FEB 2024

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित
पदवी / पदविका / स्वायत्त संस्था प्रमुख.

**विषय :महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ज्ञ सूचीमध्ये नांव समाविष्ट करण्याबाबत पात्र व्यक्तींकडून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याबाबत..**

संदर्भ : मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महराष्ट्र राज्य, मुंबई यांचे या कार्यालयास दिनांक ०१/०२/२०२४ रोजी सहपत्रांसह प्राप्त झालेले गोपनीय पत्र.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भित पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील निर्देश विचारात घेता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ज्ञ सूचीमध्ये नांव समाविष्ट करण्याबाबत पात्र व्यक्तींकडून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत. (सोबत सदर पत्राची सहपत्रांसह प्रत जोडली आहे.)

तद्नुषंगाने संदर्भित पत्रासोबत जोडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पत्रातील नमूद संकेतस्थळावर आपल्या संस्थेतील अध्यापकांना विषय तज्ज्ञ म्हणून अर्ज करण्यास सूचित करावे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र सहपत्रांसह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना,

D:\my documents\Misc.doc\224

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४२४/४३४,
ई-मेल–desk4a@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

गोपनिय

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर.

**विषय :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ठ करण्याबाबत पात्र व्यक्तिंकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत

**संदर्भ :** ०१. सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक मलोआ-११२३/प्र.क्र.९८/आठ, दि.०४/०५/२०२३
०२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे गोपनीय पत्र क्रमांक २२६५/तसुलोसेआ/१९/२०२२/१६, दि.१२/०१/२०२४

संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र शासन सेवेत पात्र उमेदवारांची निवड करण्यासंदर्भात विविध स्वरुपाच्या स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय परीक्षा व चाळणी परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता बाह्य माध्यमांची/ तज्ञ परीक्षकांची सुची अद्ययावत करण्याच्या कार्यपद्धतीमध्ये कालानुरुप सुधारणा करण्याच्या दृष्टीने तज्ञ परीक्षकांचे अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याचा निर्णय केला आहे. त्याकरिता संदर्भ क्रमांक २ च्या पत्रात नमूद केलेल्या संकेत स्थळावर संबंधित तज्ञ व्यक्तिंनी अर्ज सादर करावयाचे आहे. (प्रत संलग्न)

संदर्भ क्रमांक १ च्या शासन परिपत्रकात, **राज्यातील सर्व कृषी, अकृषि विद्यापीठे, सार्वजनिक अभिमत विद्यापीठे, तांत्रिक विद्यापीठे, स्वायत्त विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था, शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्था, शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित शैक्षणिक संस्था, स्वायत्त संस्था इ. सर्व शैक्षणिक संस्थामधील अध्यापकीय संवर्गातील विषयतज्ञांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सोपविण्यात आलेली गोपनीय व संवेदनशील कामे आयोगाने विहित केलेल्या कालमर्यादेत व दर्जात्मक स्वरुपात पूर्ण करुन देणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेल्या कालमर्यादेत संबंधित विषय तज्ञांची सेवा आयोगास उपलब्ध करुन देणे उपरोक्त शैक्षणिक संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील** असे नमूद करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्रमांक १ च्या शासन परिपत्रकातील उपरोक्त सुचना विचारात घेता आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संदर्भ क्रमांक २ च्या पत्रात नमूद केल्यानुसार लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर आपल्या विभागातील सर्व शैक्षणिक संस्थातील अध्यापकांना विषय तज्ञ म्हणून अर्ज करण्यास सुचित करण्यात यावे.

(डॉ.विनोद म.मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ 022-६१३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

Email ID : so-confidential2@mpsc.gov.in Desk-16 Tel No. 69385987 / 986 / 985

गोपनीय

क्रमांक- २२६५/तसूलोसेआ/१९/२०२२/१६ दिनांक- १२ जानेवारी, २०२४.

प्रति,

(१) मा. संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, ४१२, ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.

(२) मा. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, धोबी तलाव, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, फोर्ट, मुंबई-४००००१

(३) मा. संचालक,
वैद्यकीय शिक्षण संचालनालय, ४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाउंड रेल्वे स्टेशन, पी डी'मेलो रोड, सीएसएमटी जवळ, छत्रपती शिवाजी टर्मिनस क्षेत्र, फोर्ट, मुंबई- ४००००१

(४) मा. कुलगुरु,
महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठ, वाणी - दिंडोरी रोड, म्हसरूळ गाव, नाशिक-४२२००४

विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ज्ञ सूचीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत पात्र व्यक्तींकडून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र शासन सेवेत सुयोग्य व पात्र उमेदवारांची निवड करण्यासंदर्भात विविध स्वरूपाच्या स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय परीक्षा व चाळणी परीक्षा घेण्यात येतात. सदर सर्व परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता बाह्य माध्यमांची / तज्ज्ञ व्यक्तींची आवश्यकता असते. यापूर्वी तज्ज्ञ परीक्षकांचे अर्ज हे केवळ ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत होते. आयोगाकडील प्रचलित तज्ज्ञ सूची अद्ययावत करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये कालानुरूप सुधारणा करण्याच्या दृष्टीने आयोगामार्फत तज्ज्ञ परीक्षकांचे अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. त्या अनुषंगाने https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर Advisor Portal या नावाने सदरचे Portal उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर Portal चा वापर करून तज्ज्ञ व्यक्तिंनी आयोगाकडे अर्ज सादर करावयाचा आहे. सदर प्रणालीव्दारे अर्ज सादर करण्याची टप्पेनिहाय सविस्तर प्रक्रिया https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर Candidate Information >Advertisement Notification> Press Note for Inviting online applications from persons willing to work as Experts येथे दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रसिध्दीपत्रकामध्ये देण्यात आलेली आहे. (सुलभ संदर्भाकरीता प्रसिध्दीपत्रकाची तिन्ही भाषेतील प्रत सोबत जोडली आहे.)

३. आयोगाच्या गोपनीय व संवेदनशील कामकाजासाठी काही वेळा काही शैक्षणिक संस्थांमधील संबंधित विषयातील तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करून घेतांना आवश्यक सहकार्य मिळत नाही. याचा एकूणच परिणाम आयोगाच्या परीक्षांच्या वेळापत्रकावर होऊन, शासन सेवेत कामकाज करण्यासाठी आवश्यक उमेदवारांची शिफारस वेळेवर शासनास करणे शक्य होत नाही. त्यामुळे पुरेशा मनुष्यबळा अभावी शासकीय कामकाजाच्या गतीमानतेवर परिणाम होतो. या सर्व बाबींचा विचार करून, विविध शैक्षणिक संस्थांमधील विषयतज्ज्ञांच्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगास तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दिनांक ०४ मे, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रक क्रमांक: मलोआ ११२३/प्र.क्र.९८/आठ अन्वये आयोगाचे गोपनीय काम पार पाडणे विषयतज्ज्ञांना बंधनकारक केले आहे. तसेच आयोगाने विहित केलेल्या कालमर्यादेत संबंधित विषयतज्ज्ञांची सेवा आयोगास उपलब्ध करून देणे शैक्षणिक संस्था प्रमुखांवरही बंधनकारक आहे. ( सुलभ संदर्भाकरीता सदर शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. )

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. ...38...
दिनांक .. 23/1/2024
कार्यासन क्र. ...38...

४..

४. सदर शासन परिपत्रक व प्रसिध्दीपत्रक आपल्या संचालनालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था, महाविद्यालये यांच्या आस्थापनेवरील (अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक) विविध विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य (expertise) प्राप्त केलेल्या सर्व तज्ज्ञ व्यक्तिंच्या निदर्शनास आणावे व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आपल्या स्तरावरून त्यांना सूचना देऊन प्रवृत्त करण्यात यावे, अशी आपणास विनंती आहे.

आपला विश्वासू

(सु. ह. उमराणीकर)
परीक्षा नियंत्रक व सह सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

सोबत - दि. ०४ मे, 2023 रोजीचे शासन परिपत्रक

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षांच्या गोपनीय कामासाठी विषयतज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत.

सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : मलोआ ११२३/प्र.क्र.९८/आठ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम काम मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ मे, २०२३.

प्रस्तावना :

शासन सेवेमध्ये सुयोग्य व्यक्तींची पारदर्शक व निकोप पध्दतीने निवड करण्याच्या कामाकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१५ नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३२० मध्ये विहित करण्यात आलेल्या तरतूदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कामकाज चालते.

०२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सोपविण्यात आलेले कामकाज विना अडथळा व कालमर्यादेत पार पाडण्यासाठी महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे, अकृषिक विद्यापीठे, सार्वजनिक विद्यापीठे, तांत्रिक विद्यापीठे, स्वायत्त विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था, शासन अनुदानित शैक्षणिक संस्था, शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानीत शैक्षणिक संस्था व स्वायत्त शैक्षणिक संस्था यांच्या आस्थापनांवर कार्यरत असलेल्या विविध विषयांतील विषय तज्ञांची मदत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास वेळोवेळी घ्यावी लागते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गोपनीय व संवेदनशील कामासाठी वरील शैक्षणिक संस्थांमधील संबंधित विषयातील तज्ञ व्यक्तींच्या सेवा आयोगाच्या गरजेनुसार संबंधित तज्ञांशी थेट संपर्क साधून आयोगामार्फत परस्पर उपलब्ध करुन घेण्यात येतात. या कामासाठी तज्ञांना आयोगाकडून शासनमान्य दराने दैनिक व प्रवास भत्या व्यतिरिक्त विहित दराने मानधन देखील अदा करण्यात येते.

०३. तथापि आयोगाच्या गोपनीय व संवेदनशील कामकाजासाठी काही वेळा काही शैक्षणिक संस्थांमधील संबंधित विषयांतील तज्ञांची सेवा उपलब्ध करुन घेताना आवश्यक सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याचा एकूणच परिणाम परीक्षांच्या वेळापत्रकावर होतो. परिणामी शासन सेवेत कामकाज करण्यासाठी आवश्यक उमेदवार वेळेवर मिळू शकत नाहीत. त्यामुळे पुरेशा मनुष्यबळा अभावी शासकीय कामकाजाच्या गतीमानतेवर परिणाम होत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन विविध शैक्षणिक संस्थांमधील विषयतज्ञांच्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगास उपलब्ध व्हाव्यात याकरिता खालीलप्रमाणे सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :

१. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत केली जाणारी भरती प्रक्रिया राज्य शासनाच्या सेवेतील पदांवर सुयोग्य उमेदवारांची पारदर्शक व निकोप पध्दतीने निवड करण्यासाठी राबविण्यात येते. त्यामुळे सदरहू कामकाज आयोगाला सक्षमपणे विहित कालमर्यादेत करता यावे याकरिता राज्यातील कृषी विद्यापीठे, अकृषिक विद्यापीठे, सार्वजनिक विद्यापीठे, तांत्रिक विद्यापीठे, स्वायत्त विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था, शासन अनुदानित शैक्षणिक संस्था, शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित शैक्षणिक संस्था व स्वायत्त शैक्षणिक संस्था यामधील शैक्षणिक संस्थाप्रमुख व संबंधित विषय तज्ञांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास आवश्यक ते सहकार्य करावे.

२. राज्यातील सर्व कृषी, अकृषिक विद्यापीठे, सार्वजनिक अभिमत विद्यापीठे, तांत्रिक विद्यापीठे, स्वायत्त विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था, शासन अनुदानित शैक्षणिक संस्था, शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित शैक्षणिक संस्था, स्वायत्त शैक्षणिक संस्था इत्यादी सर्व शैक्षणिक संस्थांमधील अध्यापकीय संवर्गातील विषयतज्ज्ञांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सोपविण्यात आलेली गोपनीय व संवेदनशील कामे आयोगाने विहित केलेल्या कालमर्यादेत व दर्जात्मक स्वरुपात पूर्ण करुन देणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विहित केलेल्या कालमर्यादेत संबंधित विषयतज्ज्ञांची सेवा आयोगास उपलब्ध करुन देणे उपरोक्त शैक्षणिक संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

३. महाराष्ट्र लोकसेवा आयोगास विषयतज्ज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने उपरोक्त सूचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी निगडीत कामकाजासाठी समन्वयक म्हणून क्षेत्रीय स्तरावरील वरिष्ठ दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती करावी. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजाच्या आवश्यकतेनुसार विषयतज्ज्ञांच्या सेवा आयोगास उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक सहकार्य करण्याची जबाबदारी अशा समन्वयकांवर राहील.

०४. वरील सर्व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

०५. सदर परिपत्रक उच्च तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग व कृषी विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०५०४१५०५३१४५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LEENA ASHISH SANKHE

(लिना संखे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल मुंबई,
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव वै.शि व औ.द्र विभाग,
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव कृषी व पदुम विभाग.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (महाराष्ट्र लोकसेवा आयोग)
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग .
१०. निवडनस्ती कार्या-०८.